**शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती येथे उन्नत महाराष्ट्र अभियान संबंधि श्री. अविश्यांत पांडा, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांचेद्वारे मार्गदर्शन**

उन्नत महाराष्ट्र अभियान अंतर्गत शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती संस्थेतील प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या तांत्रिक कौशल्याचा उपयोग करुन ग्रामीण भागात तांत्रिक प्रकल्प राबविण्या संबंधि मार्गदर्शन करण्या करीता श्री. अविश्यांत पांडा, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांना संस्थेद्वारे दि. ०५/०१/२०२२ रोजी आमंत्रित करण्यात आले होते. सदर मार्गदर्शन कार्यक्रमात संस्थेतील प्राचार्यासह, विभाग प्रमुख, अधिष्ठाता व विभागीय समन्वयक उपस्थित होते. मार्गदर्शन बैठकीचे प्रास्ताविक प्रा. टि. सी. भगत, अभियान मुख्य समन्वयक यांनी करुन बैठक बोलविण्याचा उद्देश विषद केला. तांत्रिक प्रकल्पाचे माध्यमातुन ग्रामीण भागाचा सर्वांगीन विकास साधण्या करीता जिल्हा परिषद, अमरावती तर्फे आवश्यक ते सहकार्य करण्याचे श्री. अविश्यांत पांडा, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मार्गदर्शनातुन सांगितले. तसेच ग्रामीण भागातील रस्ते, पाणी, बंधारे इ. संबंधि विकास करण्याचे कामी या संस्थेतील अध्यापकांची व विद्यार्थ्यांची मदत घेवून त्यांना त्यांचे कौशल्याचे उपयोजन करण्याची संधी दिली जाईल या बाबत आश्वासीत केले.

संस्थेचे प्राचार्य डॉ. आर. एस. दाळू यांनी उन्नत महाराष्ट्र अभियान अंतर्गत राबविण्यात येणा-या लघू व दिर्घ कालावधीच्या प्रकल्पा संबंधि जिल्हा परिषद, अमरावती सोबत सामंजस्य करार करण्याची संकल्पना व्यक्त केली. सदर संकल्पना लवकरच प्रत्यक्ष अंमलात आनली जाईल असे सुध्दा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कळविले.

सदर मार्गदर्शन बैठक प्राचार्य डॉ. आर. एस. दाळू यांचे मार्गदर्शनात प्रा. टि. सी. भगत, अभियान मुख्य समन्वयक यांनी आयोजित करुन, बैठक आयोजना संबंधि परिश्रम घेतले.

प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती

Scanned with CamScanner



